**नियमित फौजदारी खटला क्रमांक -३९/२०२४**
**महा. शासन वि. प्रदिप सकट**
**निशाणी क्रमांक- १७/सी**

**(शासनातर्फे साक्षीदार क्रमांक - २ ची जबानी)**
**मी देवाशपथ खरे सांगतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | योगेंद्र ज्ञानदेव राणे |
| वय | - | २९ वर्षे |
| व्यवसाय | - | नोकरी |
| पत्ता | - | सोळांकूर, ता : राधानगरी, जि : कोल्हापूर |

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. कांबळे यांचे मार्फत -**

**१.** मी आरोपींना ओळखतो. आजरोजी न्यायालयात आरोपी क्र.१ हजर दिसत आहे. आरोपी क्र.२ हा मयत झाला आहे. आरोपी हे माझे मित्र होय. फिर्यादी ही माझी पत्नी आहे. आरोपी क्र.१ हे माझे वर्गमित्र होय आणि आरोपी क्र.२ हे आमचे गावातले होते.

**२.** दि.१९/११/२०२३ रोजी काहीही घडलेले नाही.

**साक्षीदाराने अभीयोग पक्षास सहकार्य न केलेने विशेष सरकारी अभीयोक्ता श्री. एस. बी. कांबळे यांनी साक्षीदारास उलटतपासणीत विचारले जाणारे सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देणेत आली.**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र.१ कडून र.रू. ५०,०००/- व आरोपी क्र.२ कडून र.रू. १,७०,०००/- हातउसणे घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. १९/११/२०२३ रोजी दुपारी ३ वाजणेचे सुमारास आरोपी पैशांच्या देवाण-

घेवाणीवरून मला गैबी येथे घेऊन गेले. हे म्हणणे खरे नाही की, मला तिथे त्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, मला तिथेच सोडून दुपारी ३:२० चे सुमारास ते माझे घरी परत गेले. हे म्हणणे खरे नाही की, मी घरी परत चालत निघालो असताना मला माझा मित्र सागर शिंदे भेटला व मी त्याचे गाडीवर सोळांकूर गावात सागरच्या दुकानात गेलो. हे म्हणणे खरे नाही की, तेथून मी माझी पत्नी हीस फोन केला असता तिने आरोपींकडून तिचा विनयभंग झाल्याचे मला फोनद्वारे कळविले. हे म्हणणे खरे आहे की, माझेत व आरोपीत न्यायालया बाहेर आपआपसात तडजोड झाली आहे व माझी आरोपींविरूध्द काही तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. ए. एस. हुपरीकर वकील यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

राधानगरी

Sd/-

दिनांक : १६/०७/२०२६

**(एन. पी. काकडे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र. २), राधानगरी

---